महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१७

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळातील इंटरनेट सुविधा कंत्राटातील गैरव्यवहाराबाबत

(१) ३५५७१ (२१-०१-२०१६). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन केंद्र अर्थात बालभारतीसाठी इंटरनेट सुविधा पुरविण्यासाठी सक्षम नसणाऱ्या कंपनीस निविदा प्रक्रिया न राबविताच कंत्राट देण्यात आले या प्रकरणातील दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी बालभारतीच्या कामगार संघटनांनी माहे ऑक्टोबर, २०१५ च्या दरम्यान शासनाकडे केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या कंपनीला हे कंत्राट देण्यात आले आहे ती कंपनी इंटरनेट सुविधा पुरविण्यास असमर्थ असल्याने त्यांना कंत्राट देऊ नये असे सल्लागार कंपनीने सुचविले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२१-०४-२०१७) : (१) व (२) सल्लागार संस्थेच्या अहवालात इंटरनेट सुविधा पुरविणाऱ्या संस्थेकडून वाढीव बॅण्ड विडथ् मिळण्याबाबत शंका उपस्थित केली होती.

(३) सदर संस्थेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठाच्या जनसंज्ञापन आणि पत्रकारिता विभागात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थांना योग्य सोयी सुविधा पुरविण्यबाबत

(२) ६५६४६ (१६-१२-२०१६). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या जनसंज्ञापन आणि पत्रकारिता विभागात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थांकडून वर्षाला एक लाख इतकी फी घेतली जात असतानाही त्यांना शिकण्यासाठी केवळ ५० आसन क्षमतेची वर्गखोली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील ग्रंथालयाला स्वतंत्र जागा आणि ग्रंथपाल नसल्यामुळे कुलुपबंद कपाटात ठेवण्यात आलेल्या पुस्तकांचा विद्यार्थ्यांना वापर करता येत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, देशभरातील विविध भागातून शिक्षण घेण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना सशुल्क वसतिगृहाची सुविधाही विद्यापीठाकडून मिळू शकत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने एक लाख इतकी फी भरून शिक्षण घेण्याकरिता आलेल्या विद्यार्थांना योग्य त्या सोयी सुविधा पुरविण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२४-०४-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. मुंबई विद्यापीठामध्ये विद्यापीठ ग्रंथालय उपलब्ध असून कलिना कॅम्पसमध्ये जवाहरलाल नेहरू ग्रंथालय व फोर्ट कॅम्पसमध्ये राजाबाई टॉवर ग्रंथालय विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी उपलब्ध आहे. दोन्ही ग्रंथालयात मिळून ७०० विद्यार्थी बसू शकतात.

(३) हे अंशत: खरे आहे. विद्यापीठाच्या नियमानुसार वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. प्रत्येक विभागासाठी विद्यार्थीसंख्या निश्चित केली जाते.

(४) या स्वयंअर्थसहाय्यित अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी ४ शिक्षक, ४ तदर्थ शिक्षक, ७ visiting शिक्षक तसेच विद्यापीठामार्फत १ वर्गखोली, १ कम्प्युटर लॅब आणि १ सेमिनार हॉल उपलब्ध करुन देण्यात आला आहे. वर्गखोलीतील शिक्षण तथा प्रात्याक्षिकांच्या आधारे त्यांना उत्तम शिक्षण उपलब्ध करण्यात येत आहे. विभागानुसार निश्चित प्रमाणात विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्ये प्रवेश दिला जातो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील उर्दू साहित्य अकादमी व उर्दू भाषा भवन संचालनालयाकरिता जागा व आवश्यकत्या पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

(३) ६५६७७ (१६-१२-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः अल्पसंख्यांक विभागाच्या तसेच उच्च शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील मुंबई, औरंगाबाद, पुणे व नागपूर येथे उर्दू साहित्य अकादमी व उर्दू भाषा भवन संचालनालयाकरिता आवश्यक असलेली जागा व आवश्यक त्या पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी राज्यातील अल्पसंख्यांक समुदायाच्या नागरिकांनी, धार्मिक नेत्यांनी, स्थानिक लोकप्रतिनिधींनी व सेवाभावी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री (अल्पसंख्यांक विकास), मा. राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास), प्रधान सचिव (अल्पसंख्यांक विकास), तसेच संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा विभागीय महसूल आयुक्त (कोकण, नाशिक, पुणे, मुंबई, औरंगाबाद, अमरावती, नागपूर), तसेच संबंधित वा त्यांच्या आधिपत्याखालील व इतर तत्सम अधिकाऱ्यांकडे माहे जुलै,२०१६ मध्ये वा त्या दरम्यान लेखीनिवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्नोक्त बाब (१) च्या अनुषंगाने संबंधित अल्पसंख्यांक विभागाच्यावतीने तसेच जनप्रतिनिधी व जागृत नागरिकांच्या तसेच अल्पसंख्यांकांच्या संघटनेने सदर बाब वेळोवेळी निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निष्पन्न झाले व त्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१८-०४-२०१७) : (१) व (२) माहे जुलै, २०१६ व त्या दरम्यान असे निवेदन प्राप्त झाले किंवा कसे याबाबत प्रश्नात उल्लेखित कार्यालयाकडून माहिती मागविण्यात आली असता कोणत्याही कार्यालयाने असे निवेदन प्राप्त झाल्याचा अहवाल सादर केलेला नाही. सद्य:स्थितीत महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीचे कार्यालय, डी.डी.बिल्डींग, दुसरा माळा, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई- ४०० ०२३ येथे कार्यरत असून सद्य:स्थितीत सदर अकादमीचे औरंगाबाद, पुणे वा नागपूर येथे कार्यालय सुरु करण्याचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही. त्याचप्रमाणे उर्दू भाषाभवन संचालनालय स्थापन करण्याचा देखील कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शिक्षकांना सर्वेक्षणाचे मानधन देण्याच्या उपाययोजनाबाबत

(४) ६५७३८ (०५-०१-२०१७). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०११ मध्ये राज्यातील शिक्षकांच्या सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षणाच्या कामासाठी सेवा अधिग्रहित करण्यात आल्या असून ठाणे जिल्हयातील व विशेषत: मुंब्रा प्रभागातील १००८ शिक्षकांचा समावेश असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वेक्षणाचे काम करणाऱ्या शिक्षकांना ५ वर्षे उलटूनही अद्यापी मानधन दिले नसल्याची बाब दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शिक्षकांच्या मानधनाचे ३४ कोटी रुपये शासनाने देय असूनही अद्याप त्याना देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याची कारणे काय आहेत, तसेच सर्वेक्षणाचे काम करणा-या शिक्षकांना मानधन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२७-०४-२०१७) : (१) अंशत: खरे आहे. मुंब्रा प्रभागातील २३८ शिक्षकांच्या सेवा सदर सर्वेक्षणाच्या कामासाठी अधिग्रहीत करण्यात आलेल्या होत्या.
(२), (३) व (४) सर्वेक्षणाच्या कामाकरिता नियुक्त केलेल्या शिक्षकांना द्यावयाच्या मानधनाच्या ५०% रक्कमेचे वाटप जून, २०१३ मध्ये करण्यात आले. व उर्वरित ५०% रक्कमेचे वाटप दि.२६.०८.२०१६ रोजी करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्हयातील शिवाजी विद्यापीठांतर्गत दूर शिक्षणाच्या अभ्यासकेंद्राकडून विद्यार्थ्यांकडून अवाजवी शुल्क आकारण्यात येत असलेबाबत

(५) ६५८३४ (१६-१२-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) कोल्हापूर जिल्हयातील शिवाजी विद्यापीठांतर्गत दूरशिक्षणाकरिता काही अभ्यासकेंद्राकडून विहित फी पेक्षा जादा शुल्क आकारण्यात येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, व्यावसायिक, नोकरदार तसेच वर्गात ज्यांना दररोज उपस्थिती लावून शिक्षण घेता येत नाही अशांसाठी दूर शिक्षण केंद्रातून शिक्षण घेणे सोयीचे पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दूर शिक्षण केंद्रातून शिक्षण घेणाऱ्यांची संख्या दरवर्षी वाढत चालली असून, दूर शिक्षण केंद्र बांधकाम व विकास निधीच्या नावाखाली विद्यार्थ्यांकडून अवाजवी शुल्क आकारीत असल्याबाबाबतच्या तक्रारी विद्यार्थ्यांनी संबंधित विभागाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२४-०४-२०१७) : (१) हे खरे नाही. तथापि शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज या एकाच अभ्यासकेंद्रामध्ये विद्यापीठाने ठरवून दिलेल्या फी पेक्षा जादा शुल्क आकारल्याबाबत तक्रारीचे दिनांक ०२/०९/२०१६ रोजीचे पत्र जिल्हा संयोजक, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, सांगली यांनी संबंधित अभ्याकेंद्राच्या प्राचार्यांना दिले होते व त्याची प्रत वि'द्यापीठाकडे पाठविण्यात आली होती.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. जिल्हा संयोजक, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, सांगली यांच्या कोणतेही पुरावे न देता दि.०२/०९/२०१६ रोजीच्या केलेल्या आरोपाच्या पत्राव्यतिरिक्त कोणत्याही विद्यार्थ्यांकडून तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) तक्रारीस अनुसरुन विद्यापीठाने दि. १६/०९/२०१६रोजीच्या पत्रान्वये संबंधित अभ्यासकेंद्रात उपरोक्त बाबत अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार संबंधित केंद्रामार्फत विहीत शुल्क व पावती व्यतिरिक्त जादा रक्कम घेतली जात नाही असे कळविले आहे. तद्नंतर जिल्हा संयोजक, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, सांगली यांना सदर तक्रारीबाबत काही पुरावे असल्यास दि. २४/१०२०१६ पर्यंत सादर करण्याबाबत कळविले होते. अद्याप कोणतेही पुरावे प्राप्त झालेले नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे नावाने मंजूर केलेल्या अध्यासन केंद्राचा निधी विद्यापिठास वितरित करणेबाबत

(६) ६६२२७ (१६-१२-२०१६). श्री.शंभूराज देसाई (पाटण) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे शिल्पकार, राज्याचे माजी गृह मंत्री लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे नावाने शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विद्यापीठांमध्ये अध्यासन केंद्र सुरु करण्याकरिता शासनाच्यावतीने मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास या अध्यासन केंद्राकरिता शासनाने ३ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली असून राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक १७ जानेवारी, २०१३ रोजी वा त्यासुमारास सदरचा निधी शिवाजी विद्यापीठास उपलब्ध करून देणेसंदर्भातील शासन निर्णयही पारित केला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १९ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मा. शिक्षण मंत्री यांनी विधानसभेत यासंदर्भात तात्काळ या अध्यासन केंद्राचा सन २०१३-१४ व २०१४-१५ चा निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासन दिले होते. त्यानुसार निधीचे मागणी करणारे पत्रही दिनांक ०३ सप्टेंबर, २०१५ व दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.शिक्षण मंत्री यांचेकडे दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०६-२०१७) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) महाराष्ट्रातील विविध अकृषि विद्यापीठांकडून अध्यासन निर्माण करण्याबाबत वाढती मागणी विचारात घेऊन अध्यासनासंदर्भात निश्चित धोरण तयार करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. यासंदर्भात निर्णय झाल्यानंतरच अध्यासन निर्मीतीचा विचार करणे अपेक्षित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

विद्यार्थ्यांच्या अंतर्गत परीक्षांचे निकाल राखून ठेवण्यास कारणीभूत ठरलेल्या महाविद्यालयांवर कारवाई करण्याबाबत

(७) ६७०३९ (१६-१२-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विद्यार्थ्यांच्या अंतर्गत परीक्षांचे गुण वेळेवर न पाठविल्याने त्यांचे निकाल राखून ठेवण्यास कारणीभूत ठरलेल्या पुणे, नाशिक व अहमदनगर जिल्हयातील ४२ महाविद्यालयांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सुमारे दोन लाख तीस हजार रुपयांचा दंड ठोठावल्याची बाब दिनांक १३ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे शासनाने याबाबत दिरंगाई करणाऱ्या महाविद्यालयांवर केवळ दंडात्मक कारवाई न करता अन्य कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२७-०४-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.
(२) विद्यार्थ्यांच्या अंतर्गत परिक्षांचे गुण विद्यापीठास प्राप्त न झाल्यामुळे अनेक महाविद्यालयांकडून अशाप्रकारचे गुण विहित मुदतीनंतर स्विकारण्याबाबतच्या विनंतीवरुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन अशा अर्जांबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी परीक्षा मंडळाने एक समिती नियुक्त केली होती. सदर समितीने घेतलेल्या निर्णयानुसार संबंधित महाविद्यालयाने दंड आकारुन अशा विद्यार्थ्यांचे गुण स्विकारण्यात येऊन त्यांचा निकाल जाहीर करण्याची पुढील प्रक्रिया तद्नंतर राबविण्यात आली.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर येथील क्रीडा संकुलाच्या झालेल्या दुरवस्थेबाबत

(८) ६७१४६ (१६-१२-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूरसह पाच जिल्ह्यांच्या खेळाडूंसाठी कोल्हापूर येथे क्रीडा संकुल उभारण्यात आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर क्रीडा संकुलाचे काम अर्धवट असून, बांधकामाचे साहित्य पडून आहे. झाडे झुडपे वाढली असून तलावात सांडपाणी मिसळल्याने पाणी दुषित झाले आहे, तसेच मैदानांची दुरवस्था झाली असून, अनेक प्रकारचे खेळ खेळण्यासाठी व सराव करण्यासाठी उत्तम दर्जाचे प्रशिक्षक, चांगल्या दर्जाचे मैदान, सराव शिबिरांची संख्या कमी तसेच खेळांसाठी लागणारे साहित्य उपलब्ध नसणे अशा अनेक प्रकारच्या पायाभूत सोयी सुविधांचा अभाव असल्याने खेळाडूंना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास प्रश्नोक्त भाग (२) बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२७-०४-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर क्रीडा संकुलातील १० मी., २५ मी. व ५० मी. शूटींग रेंज, संरक्षक भिंत, अंतर्गत पाणी पुरवठा व्यवस्था, विद्युत व्यवस्था इ. कामे तसेच ४०० मी. धावनमार्ग, खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, फुटबॉल, टेनीस क्रीडांगण इ. क्रीडा सुविधा पूर्ण झाल्या आहेत. सद्य:स्थितीत क्रीडा प्रबोधिनी, जि.प.कोल्हापूर व क्रीडा प्रशिक्षण केंद्रातील अनेक खेळाडू दैनंदिन सराव करित असून कार्यालयातील मैदानी क्रीडा मार्गदर्शक यांचेकडून नियमित दैनंदिन प्रशिक्षण दिले जाते. तथापि, जलतरण व डायव्हींग तलावाचे काम ५०% पूर्ण असून पश्चिमेकडील संरक्षक भिंतीच्या बाहेरील बाजूस सांडपाणी साचल्याने त्याचे काम बंद आहे. संरक्षक भिंतीच्या बाहेरील बाजूने ओपन नाला काढून सांडपाण्याचा निचरा करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत निविदा प्रक्रियेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. सद्या संकुलातील सुविधांनिहाय पुरेसे चांगल्या दर्जाचे क्रीडा साहित्य संकुल समितीमार्फत खरेदी केलेले असून खेळांडूकडून त्याचा वापर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वाशिम जिल्ह्यात सन २०१० आणि २०११ या दोन वर्षात घेण्यात आलेल्या एमएमएसच्या परिक्षेचा अहवाल वेळेत न पाठविल्याने शिष्यवृत्तीची रक्कम थकीत असल्याबाबत

(९) ६८२०४ (०६-०१-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यात सन २०१० आणि २०११ या दोन वर्षात घेण्यात आलेल्या एमएमएस या शिष्यवृत्ती परिक्षेचा अहवाल वेळेत न पाठविल्याने २६८ विद्यार्थ्यांना देय असलेली ६४ लाख ३२ हजार रुपये रक्कमेची शिष्यवृत्ती गत काही वर्षापासून थकीत असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांवर तसेच विद्यार्थ्यांची थकीत शिष्यवृत्ती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२१-०४-२०१७) : (१) होय. राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (NMMSS) ही केंद्र शासन पुरस्कृत योजना सन २००७-०८ या वर्षापासून सुरु करण्यात आली आहे. शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्याची कार्यवाही ही केंद्र शासनामार्फत एस.बी.आय., नवी दिल्ली यांचेकडून संबंधित शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर ECS पध्दतीने परस्पर जमा करण्यात येते. सन २०१० व २०११ ची शिष्यवृत्ती परीक्षा अनुक्रमे दिनांक.२१.११.२०१० व दिनांक २०.११.२०११ रोजी घेण्यात आली. तेव्हा वाशिम जिल्हयामधून २६८ विद्यार्थी हे शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले आहेत. परंतु तत्कालीन शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.वाशिम यांनी या दोन्ही परिक्षेचा इ.९ वी चा मूळ प्रस्तावच सादर न केल्यामुळे सदरचे विद्यार्थी हे शिष्यवृत्तीपासून वंचित राहिलेले आहेत.
(२) व (३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.वाशिम, यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई सुरू आहे. तसेच संबंधित २६८ विद्यार्थ्यांची माहिती प्राप्त झाली असून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणेबाबत केंद्र शासनास पत्रव्यवहार करण्यात आला आहे. शिष्यवृत्ती मंजूर करण्याची कार्यवाही केंद्रशासन स्तरावर सुरु आहे.

इंद्रायणी नदीचा समावेश राष्ट्रीय नदी सुधार योजनेत करण्याबाबत

(१०) ७११८९ (१६-०१-२०१७). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या राष्ट्रीय नदी सुधार योजनेत तीर्थक्षेत्र आळंदी (ता.खेड, जि.पुणे) येथील इंद्रायणी नदीचा समावेश करून सुमारे २५० कोटी रुपयांचा योजना प्रकल्प अहवाल तयार करून शासनाने केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प अहवालास केंद्र शासनाकडुन मंजुरी देण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, अद्याप या प्रकल्प अहवालास मंजुरी मिळाली नसल्यास ती मिळण्याबाबत शासनाकडून केंद्र शासनाकडे कोणता पाठपुरावा करण्यात आला आहे ?

श्री. रामदास कदम (१४-०६-२०१७) : (१) मुख्याधिकारी, आळंदी नगर परिषद यांनी दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजीच्या पत्रान्वये पाठविलेला रु. ११५.३२ कोटी रकमेचा प्रस्ताव दिनांक ३० ऑक्टोंबर, २०१५ रोजी केंद्र शासनास मंजूरीसाठी पाठविण्यात आला होता.

(२) व (३)

• केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या दिनांक २८ जानेवारी, २०१६ रोजीच्या पत्रानूसार केंद्र शासनाने राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेतंर्गत अर्थसंकल्पिय तरतूद अपुरी असल्याने प्रस्तावाचा विचार करणे शक्य होणार नसल्याचे कळविले आहे.

• सदर वस्तुस्थिती मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद यांना या विभागाच्या क्र. रानकृ २०१५/प्र.क्र. ३६/तां.क.१, दिनांक २३ मे, २०१६ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिक्षा विभागात झालेला गैरप्रकार

(११) ७२००९ (१६-१२-२०१६). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिक्षा विभागात एकच विद्यार्थी एकच परिक्षा क्रमांक, एकाच दिनांकाच्या दोन गुणपत्रिका मात्र यातील एका गुणपत्रकात विद्यार्थी एका विषयात अनुत्तीर्ण आणि दुसऱ्या गुणपत्रिकेत त्याच विषयात उत्तीर्ण झाल्याचे दाखविण्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२४-०४-२०१७) : (१) हे खरे आहे.

(२) पुणे इन्स्टिट्यूट ऑफ कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी, धनकवाडी, पुणे या महाविद्यालयातील विद्यार्थी श्री.बैरागी चितांमण दत्तात्रय यांचा क्रमांक PRN महाविद्यालयामार्फत अपुरा भरल्याने सुरुवातीस त्याचा निकाल हा Fail ATKT असा जाहीर करण्यात आला होता. तथापि महाविद्यालयामार्फत आवश्यक माहिती मागवून घेण्यात येवून त्याचा सुधारित निकाल हा 'उच्च व्दीतीय श्रेणीत उत्तीर्ण' असा जाहीर करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या परिक्षा व परिक्षेचे निकाल जाहिर होण्यास होणाऱ्या विलंबाबाबत

(१२) ७३८५७ (२०-०४-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या परिक्षा व या परिक्षेंचे निकाल जाहिर होण्यास बरीच अनियमितता होत असून परिक्षार्थी विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका या खाजगी संस्थे मार्फत स्कॅनिंग होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संस्थेकडून अनेक विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका गहाळ झाल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया गेले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधितांवर कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) : (१) होय, हे खरे आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या परिक्षार्थी विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका स्कॅनिंग करण्यासाठीचे काम मॅग्नेटीक इन्फोटेक प्रा. लि., हैदराबाद या संस्थेला रितसर निविदा पध्दतीचा अवलंब करुन देण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही. विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका गहाळ झाल्या नसून त्या विद्यापीठातच आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक वर्ष वाया गेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मराठी भाषा संवर्धनासाठी कृती आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याबाबत

(१३) ७४१२२ (०५-०४-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठी भाषा संवर्धनासाठी ठोस कृती आराखडा तयार करुन त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी अशी मागणी मराठी भाषे संदर्भात अभ्यास करणा-या "मराठी अभ्यास केंद्राने" मुंबई विद्यापीठाकडे केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात सन २००८ मध्ये मागणीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाने महाविद्यालयामध्ये व विद्यापीठाच्या सर्व विभागामध्ये मराठी भाषा व वाङ्ःमय मंडळ अनिवार्य करण्यासंदर्भातील परिपत्रक काढले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एकूण किती महाविद्यालयानी व विद्यापीठातील विभागाने उक्त परिपत्रकाची अमलबजावणी केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) : (१) हे खरे नाही. तथापि महाराष्ट्र शासनाच्या, मराठी भाषा विभागाच्या परिपत्रक क्र. मभापं/२०१६/ प्र.क्र. ११८/भाषा-२, दि. ०३/१२/२०१६ अन्वये मुंबई विद्यापीठाकडून परिपत्रक क्र. वि.क.वि./५९/२०१६, दि. २२ डिसेंबर नुसार याबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(२) सदरच्या अनुषंगाने विद्यापीठाने वेळोवेळी परिपत्रके निर्गमित केली आहेत.
(३) एकूण ९० महाविद्यालयांनी व विद्यापीठातील मराठी विभागाने उक्त परिपत्रकाची अंमलबजावणी केली आहे. तसेच अनेक महाविद्यालयांकडून सदरबाबतचा अहवाल विद्यापीठास पुढील कालावधीत सादर होणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

लातूरच्या महिला पॉलिटेक्नीकचे अस्तीत्व कायम ठेवण्याबाबत

(१४) ७४१२९ (२०-०४-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर येथे नव्याने अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन करताना लातूर आणि यवतमाळ येथे लोकनेते विलासराव देशमुख यांनी विशिष्ट हेतू ठेवून सुरु केलेले महिला पॉलीटेक्निकचे स्वतंत्र अस्तीत्व संपुष्टात येणार असून तसेच लातूर येथे सुरु असलेल्या पुरणमल लाहोटी या पॉलीटेक्निक कॉलेजमधील जागा टप्प्या टप्प्याने कमी करुन तेही बंद करण्याची योजना असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने लातूर येथील महिला पॉलीटेक्निकचे अस्तीत्व कायम ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०६-२०१७) : (१) होय.
(२) सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरीता राज्यातील शासकीय व शासन अनुदानित अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयातील पदविका अभ्यासक्रमाची एकूण २२८१० इतकी प्रवेश क्षमता आहे. त्यापैकी १९९७० इतक्या जागा भरलेल्या असून २८४० इतक्या जागा रिक्त आहेत. विविध पदविका अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षात शिकणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांपैकी ९०% पेक्षा जास्त विद्यार्थी अभियांत्रिकी महाविद्यालयातील अभ्यासक्रमांना थेट व्दितीय वर्षासाठी प्रवेश घेण्यास इच्छुक असतात. राज्यातील प्रत्येक विद्यापीठ क्षेत्रात एक शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय असावे असे शासनाचे धोरण आहे. नवीन स्वतंत्र शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाची निर्मिती करावयाची झाली तर त्यास प्रथम चार वर्षाकरीता सुमारे रु.७२ कोटी इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेऊन शासनाच्या उपलब्ध साधन संपत्तीचा व मनुष्यबळाचा जास्तीतजास्त वापर करुन अल्प खर्चात शासकीय तंत्रनिकेतनातील पदविका अभ्यासक्रम टप्प्या टप्प्याने बंद करुन श्रेणीवर्धनाने अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

तसेच सदर ठिकाणी पदविका महाविद्यालयाबरोबरच पदवी महाविद्यालयही चालू करण्याबाबत शासन प्रयत्नशील आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

गडचिरोली जिल्हयातील गोंडवाना विद्यापीठात पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पुरेशी व्यवस्था नसल्याबाबत

(१५) ७४३४२ (२०-०४-२०१७). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील गोंडवाना विद्यापीठात गणित, वाणिज्य, इंग्रजी, इतिहास, आणि समाजशास्त्र वगळता इतर विषयाचे पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पुरेशी व्यवस्था नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोंडवाना विद्यापीठातील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी नागपूर विद्यापीठात विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गोंडवाना विद्यापीठाच्या स्थापनेपासून अद्यापपर्यंत पदभरतीची प्रक्रिया प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने गोंडवाना विद्यापीठास संपूर्ण स्वायतता तसेच पदभरतीकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) : (१) हे खरे आहे. गोंडवाना विद्यापीठातील पाच पदव्युत्तर विभाग वगळता इतर पदव्युत्तर विभाग विद्यापीठात सुरु नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. विद्यापीठातील पाच पदव्युत्तर विभागास शिक्षकांच्या एकूण ३५ पदांना मान्यता देण्यात आली असून सहाय्यक प्राध्यापकांची एकूण १८ पदे भरण्यात आली आहेत. उर्वरित सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक पदे भण्याबाबत कार्यवाही विद्यापीठ सतरावर सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणेच्या बालभारती कार्यालयात अधिकाऱ्यांनी केलेल्या मद्य पार्टीची चौकशी करण्याबाबत

(१६) ७४५३० (२०-०४-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.विजय औटी (पारनेर), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील विदयार्थ्यांच्या पाठयपुस्तकांची निर्मिती करणाऱ्या बालभारती या संस्थेला दिनांक २३ जानेवारीला पन्नास वर्ष पुर्ण झाल्याबद्दल दिनांक २३ व २४ जानेवारी, २०१७ रोजी

वा त्या सुमारास संस्थेच्या आवारात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असता या कार्यक्रमा दरम्यान कार्यालयातच अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मद्य पार्टी केल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालभारतीमधील अनेक अधिकारी नेहमीच मद्यधुंद अवस्थेत संस्थेत असून तसेच सर्व नियमांचे उल्लंघन करुन कोणालाही न जुमानता मनमानी करत असल्याचे वरिष्ठांना माहित असूनही त्यांच्यावर कोणतीच कारवाई केली जात नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१७) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) एका अधिकाऱ्यास निलंबित करण्यात आले आहे. तसेच, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी समिती गठीत केली असून समितीमार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शिधावाटप दुकानदार व किरकोळ केरोसीन दुकानदारांना बँकाचे व्यावसायिक प्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी देणार असल्याबाबत

(१७) ७४७०५ (०६-०५-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रास्त दराच्या धान्य वितरण व्यवस्थेत पारदर्शकता आणण्यासाठी अन्न व नागरी पुरवठा विभागाने रेशन दुकानांचे डिजिटायझेशन करण्याची प्रक्रिया सुरु केली असून या प्रक्रियेचा एक भाग म्हणून रेशन दुकानामध्ये बँकेच्या व्यवहाराची सुविधा उपलब्ध होणार असल्याचे तसेच शिधावाटप दुकानदार व किरकोळ केरोसीन दुकानदारांना बँकाचे व्यावसायिक प्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी उपलब्ध होणार असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेचे नेमके स्वरूप काय आहे व राज्यात उक्त योजना केंव्हापासून अंमलात येणार आहे,

(३) तसेच उक्त योजना राबविण्यासाठी जिल्हास्तरीय समित्या स्थापन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त सुविधेमुळे दुर्गम भागात वाडी वस्त्यांवर असलेल्या शिधावाटप धान्य दुकानांतून बँकेच्या कामासाठी नवा पर्याय उपलब्ध होणार आहे, हे ही खरे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट (०६-०६-२०१७) : (१) होय

(२), (३), (४) व (५) राज्यातील रास्तभाव/शिधावाटप दुकानदार व किरकोळ केरोसीन दुकानदार यांना बँकांचे व्यावसायिक प्रतिनिधी म्हणून नियुक्त करण्यासाठी प्रत्येक जिल्हयाकरीता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आणि मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रासाठी नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली ६ सदस्यीय समिती दिनांक ६.१२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आली आहे. तसेच दि.३.२.२०१७ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील रास्तभाव/ शिधावाटप दुकानदार व किरकोळ केरोसीन दुकानदार यांना बँकांचे व्यावसायिक प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकांसोबतच खाजगी बँकांना देखील परवानगी देण्यात आलेली आहे.

व्यावसायिक प्रतिनिधी म्हणून काम करताना रास्तभाव दुकानांनी बँकींग सेवा जसे कर्जदारांची ओळख पटवणे, लहान रकमेच्या ठेवी घेणे, कमी रक्कमेच्या ठेवी वितरीत करणे, Micro Insurance, Mutual fund, Pension product इत्यादी बँकींग सेवा पुरविणे तसेच, बँक व्यवसायाच्या अनुषंगाने इतर अनेक व्यवहार नेमण्यात आलेले व्यावसायिक प्रतिनिधी करणार आहेत. यामुळे राज्यातील रास्तभाव/ शिधावाटप दुकानदार व किरकोळ केरोसीन दुकानदार यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे.

राज्यातील रास्तभाव दुकानदारांना बँकांचे व्यावसायिक प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्याची कार्यवाही राज्यात सुरु आहे.

भंडारा जिल्हयातील अनुदानावर सुरु असलेल्या सार्वजनिक वाचनालयांची तपासणी करणेबाबत

(१८) ७४८२९ (२०-०४-२०१७). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्हयात ग्रामिण भागात शासकीय अनुदानावर सुरु असलेली सार्वजनिक वाचनालये केवळ अनुदान मिळविण्यासाठीच मर्यादीत असून तपासणी पथकाकडून कोणतीही योग्य कार्यवाही होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाचनालयाचे कारभार सुरळीत आणि पारदर्शी होण्यासाठी तसेच शासनाचे मुळ उद्देश पुर्ण न करणाऱ्या सार्वजनिक वाचनालयांची तपासणी करणार आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी तपासणी करुन, व त्यानुसार दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. विनोद तावडे (१३-०६-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये नियम, १९७०मधील तरतुदीनुसार शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांची नियमित वार्षिक तपासणी करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सन २०१७-१८या शैक्षणिक वर्षात तंत्रनिकेतन, नर्सिंग, फार्मसी अभ्यासक्रमांचे शुल्का बाबत

(१९) ७५१६२ (२०-०४-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ९० टक्के महाविद्यालयांचे सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील तंत्रनिकेतन, नर्सिंग, फार्मसी अभ्यासक्रमांचे शिक्षण शुल्क सरासरी ४० टक्क्यांनी घटणार असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाविद्यालयांनी सादर केलेल्या सन २०१५-१६ चा ताळेबंद अहवालात आणि समितीच्या सदस्यांना महाविद्यालयांच्या तपासणीत शिपाई, चालक यांच्या अतिरिक्त जागा दाखविणे, आस्थापना खर्च (वीज बिल इत्यादी) वेतन खर्चापेक्षा जास्त दाखवणे, इतर उत्पन्न लपवणे, शैक्षणिक सुविधा फक्त कागदावर दाखवणे तसेच एकाच शिक्षकावर दोन शिफ़्त चालविणे इत्यादी त्रुटी आढळून आल्यामुळे घट करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग २ मधील त्रुटी आढळलेल्या व्यवस्थापनेवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०६-२०१७) : (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) व (३) नाही, हे खरे नाही.

(४) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अध्यादेश २०१५, दिनांक १७ ऑगस्ट, २०१५ मधील कायदयातील कलम २०(२) प्रमाणे कायदयातील तरतूदींचे ज्या शैक्षणिक संस्था उल्लंघन करताना आढळतात, अशा संस्थांवर शुल्क नियामक प्राधिकरणाद्वारे कार्यवाही करण्यात येते.

मुंबई विद्यापीठात पदव्युत्तर स्तरावर सुरु असलेल्या विविध देशी-परदेशी भाषांच्या विभागांना पुरेसे विद्यार्थी मिळत नसल्याबाबत

(२०) ७५२२४ (२०-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठात पदव्युत्तर स्तरावर सुरु असलेल्या विविध देशी-परदेशी भाषांच्या विभागांना पुरेसे विद्यार्थी मिळत नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थी नसलेले विभाग शासनाद्वारे बंद करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्नोक्त भाग १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने पुरेसे विद्यार्थी नसलेले विभाग तात्काळ बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) मुंबई विद्यापीठातील १४ भाषा विभागांपैकी काही भाषा विभागांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमांची नोंदणी कमी असली तरी त्या विभागांमार्फत एम.फिल. व पीएचडीचे अभ्यासक्रम राबविले जातात. अशा भाषांचे विभाग चालू रहावेत यासाठी विभागांमार्फत विविध प्रकारची चर्चासत्रे, कार्यशाळा, परिसंवाद, परिषदा इत्यादींचे आयोजन केले जाते आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील ५० टक्क्याहून अधिक विद्यार्थ्यांना, मध्यान्ह भोजन योजने अंतर्गत, पोषण आहार देण्यात येत नसल्याबाबत

(२१) ७५५३९ (२०-०४-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्राच्या सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत मुंबईतील ५० टक्क्याहून अधिक विद्यार्थ्यांना, अद्यापही मध्यान्ह भोजन योजने अंतर्गत पोषण आहार देण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील शाळांना पुरविण्यात येत असलेला पोषण आहार निकृष्ट दर्जाचा असल्याचे माझगाव सेंट मेरी (एसएससी) शाळेसह अनेक शाळांमध्ये माहे जानेवारी, २०१७ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करून व संबंधीत संस्थे विरूध्द तसेच मुंबईतील सर्व शाळांतील विद्यार्थ्यांना पुरेशा प्रमाणात चांगल्या दर्जाचे पोषण आहार पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०१-०६-२०१७) : (१) व (२) हे खरे नाही.
(३) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना गरम, ताजे व सकस आहार केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या प्रमाणानुसार उपलब्ध करुन देण्याबाबत वेळोवेळी सूचना देण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई उपनगरातील जोगेश्वरीमधील इस्माईल युसूफ महाविद्यालयात विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसाठी सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

(२२) ७६३१३ (२०-०४-२०१७). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील जोगेश्वरीमधील इस्माईल युसूफ महाविद्यालयात ऑलिंपीक दर्जाचे स्विमिंगपूल, मुलींसाठी अद्यावत वसतीगृह, कर्मचा-यांसाठी निवास स्थान, विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था तसेच सीसीटीव्ही कॅमेरे इत्यादी सुविधा निर्माण करण्याबाबतचा निर्णय महाविद्यालय सल्लागार समिती आणि मा.उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्या दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास झालेल्या संयुक्त बैठकीत घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महाविद्यालय हेरिटेज दर्जात मोडते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या हेरिटेज वास्तू दर्जाच्या पुनर्विकासाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) : (१) होय. दि.३०.१२.२०१६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत सदरचा निर्णय घेतला आहे.

(२) व (३) सदर महाविद्यालयाची मुख्य इमारत व मुलांचे वसतीगृह या दोन इमारती हेरिटेज दर्जात मोडत असल्या तरी त्या पुर्ण १००% हेरिटेज दर्जामध्ये मोडत नाहीत. त्यामुळे हेरिटेज वास्तु दर्जाच्या पुनर्विकासाबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठाच्या कालिना संकुलात असलेल्या मुलींच्या वसतिगृहाला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे नांव असलेल्या मुलींच्या वसतिगृहाचे नामफलक गायब असल्याबाबत

(२३) ७६३४४ (२०-०४-२०१७). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या कालिना संकुलात असलेल्या मुलींच्या वसतिगृहाला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे नांव असलेल्या मुलींच्या वसतिगृहाचा नामफलक मागील अनेक महिन्यापासून नसल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कालिना संकुलातील या वसतिगृहाच्या नूतनीकरणाचे काम सुरु असल्याचे कारण देत विद्यापीठ प्रशासनाने सदरहू नामफलक हटविला असणे मात्र नुतनीकरण होऊन सहा महिने उलटल्यानंतरही क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाचा नामफलक लावण्यात आला नसल्याने विद्यार्थ्यामध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) : (१) हे अंशत: खरे आहे. मुंबई विद्यापीठामार्फत कालिना संकुलात असलेल्या मुलींच्या वसतिगृहामध्ये दर्शनी भागामध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव असलेला लहान शिला नामफलक लावण्यात आला होता, परंतु वसतिगृहाचे संपूर्ण नुतनीकरण करण्यात आल्यामुळे सदर शिला नामफलक काढून ठेवण्यात आला होता.
(२) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले वसतिगृहाचे नुतनीकरणाचे काम नुकतेच पूर्ण झाले असल्यामुळे आता तात्पुरत्या स्वरुपाचा नामफलक लावण्यात आला असून कायमस्वरुपाचा नामफलक लावण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले वसतिगृहाचे संपूर्ण इमारतीचे नुतनीकरणाचे काम नुकतेच पूर्ण झाले असल्यामुळे नव्याने मोठ्या स्वरुपातील सावित्रीबाई फुले यांच्या नावाचा फलक लावण्यात येत आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पीएच. डी पदवी मिळविण्यासाठी होत असलेला गैरव्यवहार

(२४) ७६९४३ (२०-०४-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठात पीएच.डी. पदवी मिळवण्यासाठी एकच शोधनिंबध पाच-सहा जणांनी मिळून लिहून मग तोच सगळयांनी आपापल्या पी.एच.डी. प्रबंधासाठी उतरवून पदवी घेत असल्याचा गैरप्रकार माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यात पीएचडी साठी कोणत्याही विदयापीठासाठी कोणत्याही विदयाशाखेच्या जटील विषयांचे प्रबंध आणि आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकांसाठी शोधनिंबध विकणारी यंत्रणा तयार झाली असून त्याद्वारे अवघ्या १० ते १५ हजार रुपयांत तयार प्रबंध व शोधनिबंध मिळत असल्याचे दिनांक ४ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यापीठ अनुदान आयोगाने पीएच. डी साठी दिलेले निकष विद्यापीठाकडून पाळले जात नसून प्रबंधातील संशोधन आणि शैक्षणिक मुद्यांच्या असलेल्या त्रुटीबाबत दुर्लक्ष होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याप्रकरणाची चौकशी केली आहे काय, व त्यानुसार दोषी असलेल्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) : (१) हे खरे नाही. प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांचे संबंधित संशोधन केंद्रात शिर्षक निवडीसाठी समितीसमोर सादरीकरण घेण्यात येऊन समितीने शिफारस केल्यानंतर शिर्षक मान्यतेच्या प्रस्तावास विद्यापीठाची 'संशोधन व मान्यता समिती' मान्यता देते. मान्य झालेल्या शिर्षकानुसार विद्यार्थी आपले संशोधनाचे काम पूर्ण करीत असतो. यादरम्यान विद्यार्थ्यांला आपण केलेल्या कामाचा दर सहा महिन्यानंतर मार्गदशकामार्फत अहवाल सादर करावा लागतो. प्रबंध सादर करताना विद्यापीठाच्या सॉफ्टवेअरव्दारे Plagairism Report घेण्यात येतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी दुसऱ्याने केलेल्या संशोधनाची कॉपी केली असल्यास निदर्शनास येते.
(२) ही बाब विद्यापीठाच्या निदर्शनास आली नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

सावित्रीबाई फुले विद्यापीठात, पीएचडी करणाऱ्या महिलांना, बालसंगोपणाची रजा देण्यात येत नसल्याबाबत

(२५) ७७५८४ (२०-०४-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठाने पीएचडी करणा-या महिलांना ८ महिने बाळंतपण किंवा बालसंगोपणाची रजा देण्याची तरतुद असतानाही केवळ ६ महिनेच रजा देण्यास मान्यता दिल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमावलीनुसार, पीएचडी करणा-या महिलांना, सावित्रीबाई फुले विद्यापीठाने, बाळंतपणात सवलत देण्याच्या तरतुदीचे पालन न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, शासनाने, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय, व त्यानुसार सावित्रीबाई फुले विद्यापीठास, आयोगाच्या नियमावलीचे सक्तीने पालन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र शासनाने महिलांना बाळंतपणासाठी १८० दिवस रजेची तरतूद केलेली आहे. विद्यापीठ अनुदान आयोग Regulation २०१६ नुसार झालेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांना लागू असून नियमानुसार विद्यापीठामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील २० विदयापीठातर्गंत कार्यरत असलेल्या महाविदयालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे वेतनाबाबत

(२६) ७८११२ (२०-०४-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील २० विदयापीठातर्गंत कार्यरत असलेल्या ७४१ शिक्षण महाविदयालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांच्या वेतनाची संस्थाचालक गत दोन वर्षापासुन अडवणूक करीत असल्याचे माहे डिंसेबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शिक्षण महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना वेतन न मिळाल्यामुळे तेथील अनेक कर्मचाऱ्यांवर उपासमारी वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त महविदयालयाच्या शिक्षण संस्थाचालकांवर शिक्षण विभागाचा वचक नसल्यामुळे शिक्षण संस्था आपले हुकूमशाहीचे धोरण अवलंबित आहे, हे ही खरे आहे,
(४) असल्यास, कर्मचाऱ्यांच्या वेतनाची अडवणूक करणाऱ्या शैक्षणीक संस्थाचालकांच्या गैरकारभार व कामकाजाची शिक्षण विभागाच्या समितीकडून चौकशी करण्यात आली आहे काय, व त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करण्याची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) : (१) अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांच्या वेतनाच्या अनुषंगाने नांदेड विभागातुन तक्रार प्राप्त झाली होती. तथापि, संबंधित तक्रारदार यांनी तक्रारीच्या अनुषंगाने कोणतेही पुरावे सादर केलेले नसल्याने सदर तक्रार नस्तीबंद करण्यात आल्याचे उपकुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांनी कळविले आहे.
(२) नाही.
(३) व (४) शासकीय शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे वेतन शासनाकडुन कोषागारात देयके सादर करुन अर्थसंकल्पीय प्रणालीद्वारे अदा करण्यात येते. अशासकीय अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे वेतन ,एचटीई सेवार्थ प्रणाली मार्फत अदा करण्यात येते. तथापि, कायम विना अनुदानित शिक्षण महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयांच्या संस्था चालकांची/व्यवस्थापनाची आहे. या महाविद्यालयांना शासनाकडुन वेतनासाठी कोणतेही सहाय्यक वेतन अनुदान दिले जात नाही.

कायम विना अनुदानित महाविद्यालयांना संलग्नता देतांना विद्यापीठाच्या स्थानिक चौकशी समितीद्वारे चौकशी करण्यात येते व त्रुटींचे अनुपालन करण्याबाबत संबंधित महाविद्यालयांना सूचित करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयात विविध पदांच्या जागा रिक्त असलेबाबत

(२७) ७८७३८ (२०-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २,३४८ महाविद्यालयां पैकी साडेचार लाख विद्यार्थ्यांचा कारभार पाहण्यासाठी, किमान २५० पदांची आवश्यकता असताना, सद्यस्थितीत तंत्रशिक्षण संचालनालयात, संचालक, सह संचालक, उप संचालक, सहायक संचालकासह ११५ मंजूर पदापैकी, ८८ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अभियांत्रिकी महाविद्यालयात, पदवी अध्यापकांची मंजूर १,०४५ पैकी, ५३५ (५० टक्के) पदे रिक्त असणे, पदवीका अभ्यासक्रमाची २,८५३ पैकी, १,०५७ पदे रिक्त असल्याने विद्यार्थ्यांची शिक्षणासाठी प्रचंड गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हंगामी तत्वावर सुरू असलेला तंत्रशिक्षण संचालनालयाचा कारभार व महाविद्यालयातील रिक्त पदामुळे उच्च शिक्षण घेण्याऱ्या विद्यार्थ्यांची गैर सोय होत आहे, हे ही खरे अहे काय,

(४) असल्यास, शासनाने उपरोक्त रिक्त पदे भरण्याबाबत तसेच शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता सुधारण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०६-२०१७) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी महाविद्यालयातील मंजूर ९५५ पदांपैकी ४३१ पदे रिक्त असून पदविका अभ्यासक्रमाच्या मंजूर २८५३ पदांपैकी ९६६ पदे रिक्त आहेत. परंतु विद्यार्थ्यांची शैक्षणिक गैरसोय होऊ नये म्हणून उपलब्ध अध्यापकांना जादा शैक्षणिक कार्यभार देऊन तसेच तासिका तत्वावर पुरेसे मानधन देऊन तज्ञ अध्यापकांच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

(४) प्रश्नाधीन प्रकरणी रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्रे पाठविण्यात आली आहेत. तसेच स्वायत्त व अस्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामध्ये सुरु असलेले १४५ अभ्यासक्रम बंद करण्यात आले बाबत

(२८) ७८९८२ (२०-०४-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामध्ये सुरु असलेले जवळपास १४५ अभ्यासक्रम हे युजीसी ची मान्यता नसल्याचे कारणामुळे बंद करण्यात आलेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे अभ्यासक्रम बंद झाल्याने लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने हे बंद करण्यात आलेले अभ्यासक्रम पुर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) : (१) हे खरे नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाने मुक्त विद्यापीठाच्या नवीन शिक्षणक्रमांना मान्यता देण्याचे धोरण जाहीर न केल्यामुळे या विद्यापीठाच्या जवळपास ३६ शिक्षणक्रमांचे नवीन प्रवेश बंद करावे लागले.

(२) हे खरे नाही. मुक्त विद्यापीठाने बंद झालेल्या शिक्षणक्रमांचे नवीन प्रवेश २०१६-१७ पासून बंद केले असले तरी पुढील वर्षाचे प्रवेश (Pipeline मधील) या विद्यार्थ्यांना सुरुच असल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले नाही.

(३) तत्कालीन कुलगुरु यांनी मा. मंत्री, मानव संसाधन विकास व विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष यांची प्रत्यक्ष भेट घेऊन विनंती केली आहे व त्यासंबंधीचा पत्रव्यवहार केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शासनाने राज्यात मराठी भाषा पंधरवाडा आयोजित केल्याबाबत

(२९) ७९१६५ (२०-०४-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ जानेवारी, २०१७ ते दिनांक १५ जानेवारी, २०१७ या कालावधीपर्यंत मराठी भाषा पंधरवाडा शासनाने आयोजित केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने मराठी भाषेत ५० हजार ते ७५ हजार शब्द असल्याने ते वाढविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१८-०५-२०१७) : (१) होय.
(२) भाषा संचालनालयाने विविध विषयांवरील परिभाषा कोश व शब्दावल्या यांची एकूण ३५ प्रकाशने प्रसिद्ध केली असून त्यामधील शब्दसंख्या ३,८३,६९६ इतकी आहे. यापैकी ५ कोशांचे अद्ययावतीकरण सुरू आहे. तसेच आधुनिक विज्ञान/तंत्रज्ञानाशी संबंधीत विषयांचे १०नवीन परिभाषा कोशांचे काम सुरू करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी येथील मौलाना अब्दूल कलाम आझाद वाचनालयातील अभ्यासिका केवळ उदघाटना अभावी विद्यार्थ्यांसाठी खुली झालेली नसल्याबाबत

(३०) ७९२८९ (२०-०४-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी येथील मौलाना अब्दूल कलाम आझाद वाचनालयातील अभ्यासिकेच्या नुतनीकरणाचे काम जवळपास पूर्ण झाले असूनही केवळ उद्दघाटना अभावी ही अभ्यासिका विद्यार्थ्यांसाठी अदयापी खुली झालेली नसल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत दीड वर्षापासून सुरु असलेले काम पूर्ण होऊनही उद्दघाटना अभावी अभ्यासिकेला खुली करण्यात न आल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार उक्त वाचनालयातील अभ्यासिका तात्काळ खुली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०६-२०१७) : (१) व (२) हे खरे नाही.
मौलाना अब्दूल कलाम आझाद वाचनालयातील अभ्यासिकेच्या नुतनीकरणाचे काम पूर्ण करण्यात आलेले असून आजमितीस विद्यार्थीवर्ग अभ्यासिकेचा लाभ घेत असल्याचे जिल्हा ग्रंथालय अधिकारी, परभणी यांनी सदर ग्रंथालयास प्रत्यक्ष दिलेल्या भेटीमध्ये आढळून आले आहे.
(३) विदयार्थीवर्ग अभ्यासिकेचा लाभ घेत असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्हयातील विंधन विहिरीचे काम अपूर्ण असल्याबाबत

(३१) ७९८०९ (१७-०४-२०१७). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयाकरीता सन २०१४-१५ पाणी टंचाई कार्यक्रम भाग २, ३ अंतर्गत ११६० विंधन विहिरी शासनाने मंजूर करुन यांत्रिकी उपविभाग जिल्हा परिषद नागपूरच्या वतीने बांधकाम करण्याचे प्रस्तावित केले असता यातील फक्त ६७८ विंधन विहीरीचे बांधकाम करण्यात आले असून निधी अभावी ४८२ विंधन विहीरीचे बांधकाम अपूर्ण असल्याची माहिती दिनांक ४ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार विंधन विहीरीचे अपुर्ण असलेले बांधकाम पुर्ण करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (१३-०६-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे उकळी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथील सार्वजनिक विहीरीचे पाणी प्रदूषित झाल्याबाबत

(३२) ७९९८० (२०-०४-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उकळी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथे सार्वजनिक विहीरीत मुबलक पाणीसाठा उपलब्ध असतानाही ग्रामपंचायतीने दुर्लक्ष केल्यामुळे पाणी प्रदूषित झाल्यामुळे तेथील ग्रामस्थांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम झाला असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितावर कोणती कारवाई केली व उक्त विहीरीतील पाण्याचे शुध्दीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (०१-०६-२०१७) : (१) हे खरे नाही.

सदर विहीरीचे पाणी फक्त कपडे धुण्यासाठी व गुरांना पाणी पिण्यासाठी वापरण्यात येत असल्याने तसेच येथील पाणी गावकरी पिण्यासाठी वापरत नसल्याने ग्रामस्थांच्या आरोग्यावर परिणाम होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

गडचिरोली जिल्ह्यातील सौर उर्जेवर आधारित दुहेरी पंप कार्यान्वित करणेबाबत

(३३) ८०१७३ (०६-०५-२०१७). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण भागातील नागरिकांना अल्प खर्चात पाणी पुरवठा व्हावा याकरिता सौर उर्जेवर आधारित दुहेरी पंप लघु नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यामध्ये उक्त योजनेअंतर्गत सन २०१५ पर्यन्त ३४२ ठिकाणी पंप बसविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणातील पंपाची देखभाल दुरूस्तीकडे ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष होत असल्याने सदर योजना बंद पडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्रामपंचायत स्तरावरून उक्त योजनेची सत्यस्थिती जिल्हा परिषदेला अवगत होत नसल्याने नेमक्या किती गावातील पंप बंद आहेत याविषयी जिल्हा परिषदेला माहीत नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व उक्त बंद अवस्थेतील दुहेरी पंप कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (१२-०६-२०१७) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये सन २०१५ पर्यंत ग्राम पंचायतीच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमार्फत ३४२ योजना कार्यान्वित करण्यात आल्या. या योजनांची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी ग्राम पंचायतीची असल्याने ग्राम पंचायत स्तरावर योजनांची दुरुस्ती करून योजना कार्यान्वित ठेवणे अपेक्षित आहे. परंतु, काही ग्रामपंचायतींकडून या योजनांची देखभाल दुरुस्ती करण्याकडे दुर्लक्ष झाले आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) जिल्हा परिषदेमार्फत संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती यांना बंद असलेल्या दुहेरी पंपांची माहिती उपलब्ध करून देण्याबाबत कळविण्यात आले आहे, त्यामुळे विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद येथील शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालयातील, प्राध्यापकांची रिक्त असलेली पदे व महाविद्यालयाच्या मुख्य इमारत व कार्यशाळा इमारतीच्या दुरुस्तीबाबत

(३४) ८०२४२ (२०-०४-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद येथे प्राध्यापकांच्या मंजूर असलेल्या पदांपैकी रिक्त असलेली ५६ पदे व महाविद्यालयाच्या मुख्य इमारत व कार्यशाळा इमारतीच्या दुरुस्तीच्या कामाबाबत शासनाच्या विचाराधीन असलेल्या प्रस्तावाबाबत शासनाने निर्णय घेतला आहे,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रिक्त असलेली ५६ पदे भरण्याबाबत व इमारतीच्या बांधकामाच्या दुरुस्तीसाठी एकूण किती रकमेच्या अंदाजपत्रकास शासनाने प्रशासकिय मान्यता दिली वा देण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१३-०६-२०१७) : (१) हे खरे आहे.
(२) मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार राज्यातील स्वायत्त व अस्वायत्त महाविद्यालयातील एकत्रित पदांच्या बिंदूनामावल्या प्रमाणित करण्याची व त्याअनुषंगाने आयोगास मागणीपत्रे पाठविण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

प्रश्नाधीन संस्थेच्या इमारत दुरुस्तीच्या रु.१३४.९७ लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास दिनांक ०३.०१.२०१७ च्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

सिंदखेडराजा (जि. बुलढाणा) तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक आणि माध्यमिक शाळेत पोषण आहार शिजविणा-या महिलांना ६ महिन्यापासून मानधन मिळाले नसल्याबाबत

(३५) ८०२८६ (२०-०४-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदखेडराजा (जि. बुलढाणा) तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक आणि माध्यमिक शाळेत पोषण आहार शिजविणा-या महिलांना गेल्या ६ महिन्यापासून मानधन मिळालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महिलांना मानधन न मिळण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, शासनाने या महिलांना मानधन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१७) : (१), (२) व (३) शालेय पोषण अहार योजनेंतर्गत बुलढाणा जिल्हयामध्ये स्वयंपाकी तथा मदतनीस यांचे मानधन माहे फेब्रुवारी, २०१७ पर्यंत अदा करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठाच्या परिक्षा सुरु असताना वर्ग खोल्यामध्ये गैरप्रकार होत असल्याबाबत

(३६) ८०३४५ (२०-०४-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या परिक्षा सुरु असताना वर्ग खोल्यामध्ये कॉपी मटेरिअल सापडणे, केंद्र प्रमुख गैरहजर आणि उत्तरपत्रिकेवर केंद्राचा शिक्का व पर्यवेक्षकांची सही नसणे, ओळखपत्रावर संबंधित महविद्यालयाच्या नावाचा शिक्का, प्राचार्याची सही नसणे, बैठक क्रमांकाची नोंद नसणे, आदि गैरप्रकार घडत असल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे,

(२) असल्यास, पाचशेपेक्षा जास्त परिक्षा घेणा-या परिक्षा नियंत्रणकाचे व प्रमुख कुलगुरु पद रिक्त असल्याने, तसेच परिक्षांचा गोंधळ आणि निकाल प्रलंबित असल्यामुळे विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. विद्यार्थ्यांच्या हितासाठी स्थानापन्न परीक्षा नियंत्रक या पदाची अतिरिक्त जबाबदारी विद्यापीठाच्या वरिष्ठ उपकुलसचिवांना देण्यात आली असून पूर्णवेळ परिक्षा नियंत्रकाचे पद योग्य उमेदवार न मिळाल्याने भरणे शक्य झाले नाही. सबब, ते पद भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच प्र-कुलगुरु पदासाठी सुयोग्य व्यक्तीच्या नेमणूकीची प्रक्रिया सुरु आहे.

(३) सदर बाबी पुन्हा उद्भवू नये तसेच संभाव्य गैरप्रकारास आळा बसावा यासाठी विद्यापीठाने वेळोवेळी परिपत्रके निर्गमित केली असून संबंधितांना सूचना केलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शालेय पोषण आहाराचे नविन दर जुलै, २०१६ पासून लागू करण्यात आल्याबाबत

(३७) ८०३५१ (२०-०४-२०१७). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय पोषण आहाराचे नविन दर माहे जुलै, २०१६ पासून लागू करण्यात आले आहेत हे खरे आहे काय,

(२) तसेच ऑक्टोबर/नोव्हेबर, २०१६ पर्यंत नविन दराची अंमलबजावणी माहे नोव्हेबर, २०१६ पर्यंत नाशिक जिल्हयात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने नविन वाढीव दराची अंमलबजावणी करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०९-०६-२०१७) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) नाशिक जिल्हयामध्ये शालेय पोषण आहार योजनेंतर्गत अन्न शिजविण्याच्या दरामध्ये दि.०१/०७/२०१६ पासून वाढ करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांत प्राचार्य व अर्हताप्राप्त शिक्षकीय पदे भरली जात नसल्याबाबम

(३८) ८०७११ (२०-०४-२०१७). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत अनेक महाविद्यालयांत प्राचार्य पद रिक्त असून अर्हताप्राप्त शिक्षकीय पदेही भरली जात नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा महाविद्यालयांची संलग्नता रद्द करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रकारे आतापर्यंत किती संस्थांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) : (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र विभागातील गैरकारभाराबाबत

(३९) ८०९३९ (२०-०४-२०१७). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्रावर विभागाच्या नावाऐवजी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मनेजमेंट स्टडीज रिसर्च पुणे (इंडसर्च) या स्वायत्त संस्थेचे नाव छापून आल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देण्यात आलेल्या पदवी प्रमाणपत्रावर विभागाचे नाव येणे आवश्यक होते परंतु त्याऐवजी इंडसर्च संस्थेचे नाव छापून आले असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण होऊन संतप्त भावना निर्माण झाली असून याबाबत विद्यार्थ्यांनी विभागाकडे चौकशी केली असता विभागप्रमुखानाही माहित नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, व त्यानुसार दोषी असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) : (१) व (२) होय, हे खरे आहे. व्यवस्थापन विद्याशाखेतील ३४ पदवी प्रमाणपत्रावर व्यवस्थापन विभागाऐवजी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेन्ट स्टडीज रिसर्च (इंडसर्च) या महाविद्यालयाचे नांव तांत्रिक त्रुटीमुळे छापले गेले होते.
(३) सदर बाब लक्षात येताच तातडीने सदर तांत्रिक चुकीने छापलेली प्रमाणपत्रे व्यवस्थापनशास्त्र विभाग या नावाने छापून त्वरित सर्व विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आली.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठा मध्ये करण्यात आलेल्या स्वीय सहायक पदाच्या भरतीबाबत

(४०) ८१३७६ (२०-०४-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ (नांदेड) यांनी माहे फेब्रुवारी, २०१२ मध्ये स्वीय सहायक हे पद सरळसेवेने भरण्यासाठी जाहिरात दिली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जाहिरातीस अनुसरून अनेक पात्रताधारक सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांनी अर्ज भरले व पात्र उमेदवारांची लेखीपरीक्षा, कौशल्य चाचणी परीक्षा, मुलाखतीचे आयोजन करण्यात आले असतांना अचानकपणे सदर पद सरळसेवेने न भरता पदोन्नतीने भरण्यात आलेले असून याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी कुलसचिव, विद्यापीठ (नांदेड) यांच्याकडे वारंवार केली असून मा. उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री यांच्याकडे दिनांक २० जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने दिनांक २२.०२.२०१२ रोजी स्वीय सहायक हे पद सरळसेवेने भरण्यासाठी जाहिरात दिलेली होती.सदर जाहिरातीच्या अनुषंगाने या सरळसेवेच्या पदसाठी आवेदन पत्र मागविण्यात आली. त्यानुसार उमेदवारांची लेखी परिक्षा घेण्यात आली. सदर पदसाठी लघुलेखन चाचणी, टंकलेखन चाचणी आणि मुलाखत आदी प्रक्रिया बाकी होत्या. सदर लेखी परिक्षेत केवळ एकच उमेदवार पात्र झाल्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने पुनश्च:

जाहिरात देण्याचा निर्णय घेतला होता. तथापि, तद्नंतर विद्यापीठाने विविध पदे पदोन्नतीने भरण्यासंदर्भात गठीत केलेल्या साखळी समितीने दिनांक १७.०२.२०१५ च्या अहवालामध्ये "स्वीय सहायक" हे पद पदोन्नतीस दर्शविण्यात आलेले आहे. त्यानुसार विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने तसेच शासन राजपत्र दिनांक दिनांक २४ जून, १९९७ मधील तरतुदीनुसार जून २०१६ मध्ये सदरचे स्वीय सहायकाचे पद पदोन्नतीने भरण्यात आलेले आहे. या प्रकरणी पूर्वी कोणीही चौकशी करण्याची मागणी केलेली नसल्यामुळे याबाबत चौकशी करण्यात आलेली नाही.

तथापि, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामधील स्वीय सहायक पदाच्या भरतीबाबत मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचेकडे निवेदन प्राप्त झाले.

(३) उक्त निवेदनासंदर्भात विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या अहवालच्या अनुषंगाने शासनाच्या दिनांक २१ एप्रिल, २०१७ रोजीच्या पत्रान्वये संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांच्याकडून माहिती मागविण्यात येत असून प्रकरणी कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठाच्या अनेक महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे प्रवेशाची कागदपत्रे पाठविली नसल्याल्याबाबत

(४१) ८२०४९ (२०-०४-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या महाविद्यालयीन प्रवेशासाठी कागदपत्रे जमा करण्याची मुदत दिनांक १६ जानेवारी, २०१७ पर्यंत असतानाही विद्यापीठाच्या अनेक महाविद्यालयांनी माहे जानेवारी, २०१७ नंतरही विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची कागदपत्रे जमा केली नसल्याने उक्त विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द होणार असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करुन त्यांचे प्रवेश रद्द होवून नयेत यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) मुंबई विद्यापीठाच्या काही अभ्यासक्रमांना प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांनी नांवनोंदणी क्रमांक (PRN) दिले नसल्याने महाविद्यालयांना परिपत्रक काढून त्यांची कागदपत्रे जमा करुन नांवनोंदणी क्रमांक घेण्याबाबत कळविले होते. महाविद्यालयांनी काही विद्यार्थी सोडून गेले व काहींनी प्रवेश रद्द केले आणि उर्वरित विद्यार्थ्यांची कागदपत्रे जमा करुन महाविद्यालयांनी नांवनोंदणी क्रमांक घेतलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य शासनाने शिधापत्रिका आधारकार्ड जोडण्याची मोहीम सुरु केल्यानंतर रॉकेलचा व धान्याचा कोटा कमी केल्याबाबत

(४२) ८२१७३ (२०-०४-२०१७). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने शिधापत्रिका आधारकार्ड जोडण्याची मोहीम सुरु केल्यानंतर गेल्या वर्षी रॉकेलचा सुमारे २ हजार ३०३ लिटर्सचा कोटा कमी झाला व धान्याची ६ हजार ७०७ टन मागणी घटली असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच अनेकदा दोन शिधापत्रिकेवर एकाच व्यक्तीचे नाव असणे, मृत्यूनंतरही नावे कमी न करणे, लग्नानंतर मूळ शिधापत्रिकेतील नाव कमी न करता दुसऱ्या ठिकाणी नवीन शिधापत्रिका काढणे यामुळे एकाच व्यक्तीच्या नावे दोन वेगवेगळ्या ठिकाणी धान्य कोटा जमा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच अकोला येथे केंद्रीय महामंडळाने भाड्याने घेतलेल्या रेणुका वेअरहाउसच्या बडनेरा (दाभा) गोदामातून तब्बल दीड कोटीहून अधिक किंमतीचा सहा हजार क्विंटल गहू चोरीला गेल्याचे दिनांक १९ डिसेंबर २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने धान्य आणि रॉकेलचा काळा बाजार करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर व संबधित दुकानदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट (०६-०६-२०१७) : (१) सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत गॅसजोडणीधारक शिधापत्रिकाधारकांना केरोसिन अनुज्ञेय नाही. गॅसजोडण्यांच्या संख्येत वाढ होत आहे. तसेच पात्र शिधापत्रिकाधारकांना केरोसिन व धान्य मिळण्यासाठी दि.१३ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये आधार क्रमांक सादर करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे. ज्या शिधापत्रिकाधारकांकडे आधारकार्ड नाहीत त्यांचा धान्य व केरोसिनचा कोटा आधारकार्ड सादर करेपर्यंत स्थगित ठेवण्यात येत आहे. आधारकार्ड सादर न केल्यामुळे परिणामी केरोसिनची मागणी कमी झाली आहे.

शिधापत्रिकांच्या आधारसिडींगचे काम सुरु असल्यामुळे अन्नधान्याची उचल घटल्याचे निदर्शनास आलेले नाही. तथापि लाभार्थी निवड दि.१३ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार सुरु असल्याने अन्नधान्याच्या उचलीवर परिणाम झालेला आहे.

(२) हे खरे नाही.

एखाद्या व्यक्तीच्या नावे दोन शिधापत्रिका असल्याबाबत वा एका व्यक्तीचे नाव दोन शिधापत्रिकेवर असल्याचे आढळून आल्यास याबाबत चौकशी करण्यात येते. सदर चौकशीत तथ्य आढळल्यास दोषी व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करण्यात येऊन सदर शिधापत्रिका रद्द करण्यात येते अथवा त्या व्यक्तीचे नाव वगळण्यात येते.

(३) व (४) हे खरे नाही.

तथापि अमरावती जिल्ह्यातील भारतीय अन्न महामंडळाने धान्य साठवणुकीचे काम दिलेल्या केंद्रीय वखार महामंडळाच्या बडनेरा येथील गोदामात सुमारे ८१५.६० मे.टन अन्नधान्याची तूट आली असल्याची बाब सन २०१७ मध्ये निदर्शनास आली आहे.

केंद्रीय वखार महामंडळाने केलेल्या तपासणीअंती असे निदर्शनास आले आहे की, भारतीय अन्न महामंडळाकडून निर्गमित करण्यात आलेला सिमेंट व अन्य पदार्थ मिश्रित साठा केंद्रीय वखार महामंडळाच्या बडनेरा येथील गोदामात स्विकारण्यात आाला होता. अन्नधान्यातून सिमेंट व अन्य पदार्थ वेगळे केल्यामुळे अन्नधान्याच्या वजनात तूट आली आहे. सदर तूट निर्लेखित करण्याबाबत केंद्रीय वखार महामंडळाने भारतीय अन्न महामंडळास विचारणा केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठाने पीएच.डी च्या नियमावतील बदल केले असल्याबाबत

(४३) ८२२८७ (२०-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुदान आयोगाच्या आदेशानंतर सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठाने पीएच.डी च्या नियमावलीत बदल केले असुन या नियमावलीनुसार पीएच.डी करणाऱ्या विदयापीठाच्या संशोधनाचा दर्जा वाढणार असुन मार्गदर्शकांकडील (गाईड) विदयार्थी संख्याही कमी करण्यात आली असल्याचे दिनांक १६ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे विदयापीठाने पीएच.डी करिता नव्याने तयार केलेली नियमावली विदयापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असुन हे नियम माहे जुलै, २०१६ च्या प्रवेश प्रक्रियेसाठी लागू असतील, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) : (१) हे खरे नाही. विद्यापीठ अनुदान आयोगाने एम.फिल./पीएच.डी. अभ्यासक्रमाबाबत नव्याने नियम विहित केलेले असुन दि. ०५ मे, २०१६ च्या राजपत्राव्दारे अधिसूचना काढण्यात आलेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) प्रवेश प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सावित्रीबाई फुले विदयापीठाने प्राध्यापकांची संख्या, विविध पदव्या यांची चुकीची माहिती दिली असल्याबाबत

(४४) ८२३१९ (२०-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले विदयापीठाने प्राध्यापकांची संख्या, विविध पदव्या यांची चुकीची माहिती दिली असुन याबाबत (नॅक) या संस्थेनेही दुर्लक्ष केले असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विदयापीठातील एम.टेक, अभ्यासक्रमातील कला व वाणिज्य शाखेचे विदयार्थीही प्रवेश घेऊ शकत असल्याने विदयापीठाने ही चुक नंतर दुरुस्त केली असुन पुणे विदयापीठाने नॅकला सादर केलेल्या अहवालामध्ये प्राध्यापकांची तसेच इतर काही पदव्यांच्या मान्यतेबाबतही चुकीची माहिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी करुन त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मानोरा (जि.वाशिम) तालुक्यात २४ लाखाचे शौचालय अनुदान प्रलंबित असल्याबाबत

(४५) ८२६९४ (१७-०४-२०१७). श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातली मानोरा नगर पंचायत स्थापनेपुर्वी शौचालय बांधकाम पुर्ण करणाऱ्या मानोऱ्यांतील २०० लाभार्थीना तातडीने २४ लाखाचे अनुदान वितरण करण्याचे निर्देश उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहा महिन्यापुर्वी मानोरा गटविकास अधिकाऱ्यांना दिले होते परंतु अदयापही या निर्देशाची अंमलबजावनी मानोरा पंचायत समितीने केली नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच शौचालय बांधकामासाठी नागरीकांना प्रोत्साहीत केले जात आहे, तर दुसरीकडे शौचालयाचे बांधकाम पुर्ण केल्यानंतरही लाभार्थीना गेले आठ ते दहा महिन्यापासुन अनुदान मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार लाभार्थीना तात्काळ अनुदान देण्याबाबत व अनुदान देण्यास विलंब करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलबांची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (१५-०६-२०१७) : (१) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, वाशिम यांनी दिनांक ३/६/२०१६ रोजीच्या आदेशान्वये मानोरा नगर पंचायत स्थापनेपूर्वी शौचालयाचे बांधकाम पुर्ण करणा-या २०० पात्र लाभार्थ्याकरीता रु. २४ लाख एवढे अनुदान गटविकास अधिकारी, मानोरा यांच्याकडे वितरीत करण्यात आले होते. तथापी एकुण २०० लाभार्थ्यापैकी १६९ पात्र लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य प्राध्यापक पात्रता परिक्षेत (सेट) प्रश्नपत्रिकांमध्ये चुकीच्या उत्तरांना गुण दिले बाबत.

(४६) ८२७९७ (२०-०४-२०१७). श्री.अनिल कदम (निफाड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य प्राध्यापक पात्रता परिक्षेत (सेट) पेपर कमांक एक सह ऐच्छिक विषयांच्या दोन्ही प्रश्नपत्रिकांमध्ये ८ प्रश्नांच्या चुकीच्या उत्तरांना गुण दिल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विरोधात विद्यार्थ्यांनी बेमुदत उपोषणास बसण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) : (१) हे खरे नाही.

(२) होय. हे खरे आहे. परंतु सदर बाबत विद्यार्थ्यांची कुलगुरुंशी झालेल्या चर्चेअंती विद्यार्थ्यांचे समाधान झाल्याने ते उपोषणास बसले नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

संत गाडगेबाबा अमरावती (जि.अमरावती) विद्यापीठ अंतर्गत येणा-याअनेक महाविद्यालयांमध्ये वैकल्पिक विषय अनिवार्य केल्याबाबत.

(४७) ८३२३५ (२०-०४-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ (जि.अमरावती) अंतर्गत येणाऱ्या अनेक महाविद्यालयांमध्ये वैकल्पिक विषय अनिवार्य केले असल्यामुळे विद्यार्थी संघटनांनी त्यास विरोध दर्शविला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थ्यांचे विषय निवडीचे स्वातंत्र विद्यापीठाकडून अबाधित असताना महाविद्यालयांकडून सक्ती होत असल्याने विद्यार्थ्यांना आवडीच्या विषयास अभ्यास करण्यास अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करता उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) : (१) हे खरे नाही. यासंदर्भात विद्यार्थ्यांकडून तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) हे खरे नाही. महाविद्यालयात जे विषय शिकविले जातात ते विषय घेण्यास विद्यार्थ्यांना मुभा आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

करडी (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील पाणी पुरवठा बंद असल्याबाबत

(४८) ८३५५८ (२०-०४-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राजेश काशीवार (साकोली) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करडी (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील सार्वजनिक नळ योजना पाणी पुरवठा विभागाच्या दुर्लक्षितपणामुळे सतत बंद पडत असल्याचे माहे फेब्रुवारी २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त नळपाणी पुरवठा सुरळीत होण्याकरिता व संबधितांवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (०१-०६-२०१७) : (१) अंशतः खरे आहे.

माहे डिसेंबर, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ या कालावधीमध्ये उर्ध्वनलिका दुरुस्ती, विद्युत पुरवठा खंडीत असणे तसेच ग्रीप जळणे या कारणास्तव वारंवार योजनेतील पाणी पुरवठा बंद पडत होता.
(२) सदर कालावधीमध्ये ग्रामपंचायत, करडी यांचेकडून आवश्यक दुरुस्त्या व विद्युत देयके भरुन योजना सुरु केलेली असल्याचे चौकशीअंती निदर्शनास आलेले आहे. तसेच योजना सुरळीत ठेवण्याबाबत संबंधितांना सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावतीच्या संत गाडगेबाबा विद्यापीठाच्या शिक्षण विद्याशाखेत प्रवास भत्यात लाखोंचा अपहार झाल्याबाबत

(४९) ८३५७१ (२०-०४-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील संत गाडगेबाबा विद्यापीठाच्या शिक्षण विद्याशाखेचे अधिष्ठाता यांनी विद्यापीठ प्रशासनाला दिनांक १० एप्रिल, २००८ ते २४ एप्रिल, २०१२ या कालावधीमध्ये विभागप्रमूखपदी काम केल्याचा खोटा दाखला सादर करून अधिष्ठाता पदावर पदोन्नती प्राप्त केली असून बोगस व बनावट कागदपत्राच्या आधारे ६ लाख ६२ हजार ३१३ रूपयाचे प्रवास भत्ते सादर करून विद्यापीठाची फसवणूक केल्याचे माहे दिनांक १९ फेब्रुवारी २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गंभीर प्रकरणाची तक्रार करून सुध्दा अद्यापही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित अधिष्ठातावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) : (१) मा. कुलगुरूंनी यासंदर्भात प्राप्त तक्रारींवरील सत्य शोधनासाठी विद्यापीठ स्तरावर समिती गठीत केली आहे.

(२) हे खरे नाही.

मा. कुलगुरू यांनी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने प्रकरणी चौकशी करण्यासाठी विद्यापीठ व महाविद्यालय विकास मंडळ यांच्या अध्यक्षेतखाली चौकशी करण्यासाठी समिती गठीत केली होती. परंतु विद्यापीठ अधिनियम २०१६ अन्वये सदर पद निरसित झाले. त्यामुळे आता विद्यापीठ स्तरावर नव्याने चौकशी समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(३) सदर चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करणे शक्य होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थिनी असुरक्षित असल्याबाबत

(५०) ८४११७ (२०-०४-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विद्यार्थिनीची छेड काढल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठ आवारातील मुलींच्या वसतिगृहाच्या मार्गावर अंधार असून सीसीटीव्ही यंत्रणा देखील बंद स्थितीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यापीठाचे आवार हे विद्यार्थिनींसाठी असुरक्षित झाले असून विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा प्रश्न देखील निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त विद्यापीठातील विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१२-०६-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) ज्या ठिकाणी विद्यार्थीनींची छेड काढली त्या परिसरात स्वतंत्र सुरक्षा चौकी पोस्ट तयार करण्यात आली असून तेथे २४ X ७ सुरक्षा रक्षक देण्यात येत आहे व सुस्थितीत चालू असलेले ६ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.